# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI (M.S.)

## नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य
## Innovation, Incubation & Linkages

## ''गोंडवाना विद्यापीठ नवोपक्रम कल्पनाशक्ती स्पर्धा''

## Gondwana University Innovation Ideation Competition
















**प्रस्तावना**

गोंडवाना विद्यापीठ हे सन २०२०-२१ हे वर्ष ''दशमनोत्सव'' वर्ष म्हणून साजरा करीत आहे. याअनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्राअंतर्गत सामाजिक, आर्थिक व औद्योगीक विकासास चालना देण्यासाठी आणि देशातील बेरोजगारीच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी गोंडवाना विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागा तर्फे नाविन्यपूर्ण संकल्पना वर आधारीत नवोपक्रम कल्पनाशक्ती स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

## उद्दिष्टे

- गोंडवाना विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यायातील प्रवेशित विद्यार्थ्यांना आपल्या नाविन्यपूर्ण व्यवसाय कल्पनेतून स्थानिक समस्यांचे मोठ्या प्रमाणात निराकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.
- आपल्या जिल्ह्यातील नागरीकांचे जीवनमान उंचावणे आणि संपूर्ण समाजासाठी सर्वमावेशक वाढ सुनिश्चित करणे.
- शासनाला योग्य वाटल्यास प्रस्तावित नाविण्यापूर्ण व्यवसाय संकल्पना सामाजिक व आर्थिक आव्हानांवर उपाय म्हणून कार्यरत केली जावू शकते.
- विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण वाटचालीमुळे शासनाचा फायदा होईल हे सुनिश्चित करण्यासाठी.

## स्पर्धा

विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयाअंतर्गत प्रवेशित सर्व विद्यार्थी स्पर्धेत सहभागी होण्याकरीता पात्र असतील. वयाची अथवा अभ्यासक्रमासंबंधी कुठलीही मर्यादा नाही.

### अर्जदारांना मार्गदर्शन

- अर्जदारांना अस्तित्वात असलेल्या समस्यांवर (अर्जदारांने स्वत: ओळखलेले) प्रत्यक्षात अंमलबजावणी करता येईल असे नाविन्यपूर्ण उपाय सुचवावे.
- चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांचा विकास आणि कल्याणाकरीता नाविण्यपूर्ण उत्पादन/ प्रक्रिया व सेवा अपेक्षीत आहे.
- संकल्पनेचा प्रात्यक्षिक पुरावा सादर करणे आवश्यक राहील.
- अर्जदारांना संबंधित व्यवसाय योजना देखील सादर करावी लागेल (घोषणा फलक, बॅनर, सादरीकरण, प्रायोगिक तत्वावरील प्रतिकृतीद्वारे सादर करता येईल).

## स्पर्धेचे वेळापत्रक

| अ.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| १ | नोंदणीची सुरुवात:<br>विहीत प्रारुपात ईमेलद्वारे किंवा प्रत्यक्षात संचालक ननवसा गोंडवाना विद्यापीठ यांचे कार्यालयात सादर करण्यात यावे. | २१ सप्टेंबर २०२१ पासून |
| २ | नोंदणीची अंतिम मुदत<br>विहीत प्रारुपात ईमेलद्वारे किंवा प्रत्यक्षात संचालक ननवसा गोंडवाना विद्यापीठ यांचे कार्यालयात सादर करण्यात यावे. | २८ सप्टेंबर, २०२१, सायंकाळी ५ वाजेपर्यंत |
| ३ | प्रथम स्तरावरील पाहणी व निवड झालेल्या सर्व स्पर्धकांना द्वितीय स्तरावरील सहभाग करिता कळविण्यात येईल. | २९ सप्टेंबर २०२१ |
| ४ | Start-up प्रदर्शनी (द्वितीय स्तर) | २ ते ५ ऑक्टो. २०२१ दरम्यान विद्यापीठ परिसरात प्रदर्शनी |
| ५ | अंतिम स्तर-प्रदर्शनीतील स्टार्टप ची तज्ञांकडून पाहणी, निवड आणि मार्गदर्शन | दि. ५-१०-२०२१ |
| ६ | परितोषिक वितरण सोहळा | दि.५-१०-२०२१ |

## स्पर्धेचे विषय

खालील दिलेल्या विषयात अर्जदारांनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना सुचविणे अपेक्षित आहे.

- कृषी विकास
- ग्रामिण विकास
- सामाजिक विकास
- पर्यावरण
- औद्योगिक विकास

## सहभागी होण्याकरीता

- सर्वप्रथम सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना विहीत नमुन्यामध्ये अर्ज भरणे आवश्यक राहील. सदर अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.
- अर्ज वैयक्तिक किंवा समुहाने तज्ञ प्राध्यापकाच्या मागदर्शनाअंतर्गत सादर करु शकतात. एका समुहात अधिकतम चार स्पर्धक सहभागी होवू शकतात.
- अर्जदाराने प्रकल्पाबद्दल कमाल ५०० शब्दांमध्ये प्रकल्पाबाबतचा तपशील व सोबतच प्रकल्पाचे व्हिडीओ, Document.pdf file किंवा प्रकाशित शोधनिबंध असल्यास diilgug@gmail.com किंवा udmanish@gmail.com ला ईमेल करावे अथवा व्यक्तिश: गोंडवाना विद्यापीठात ननवसा विभागात सादर करावे.

## विजेता निवड

### प्रथम स्तर:-

प्रथम स्तराअंतर्गत प्राप्त अर्जांची प्राथमिक छानणी करुन दुस-या स्तरावरील सहभागाबद्दल कळविण्यात येईल.

### द्वितीय स्तर:-

प्राथमिक छानणी अंती निवड झालेल्या प्रकल्पांची प्रदर्शनी विद्यापीठ परिसरात दि. २ ते ५ ऑक्टोंबर दरम्यान आयोजित करण्यात येईल.

### अंतिम स्तर:-

प्रदर्शनीत तज्ञांकडून दि. ५.१०.२०२१ रोजी विविध निकषांच्या आधारे पाहणी करुन निवडलेल्या प्रकल्पांतून विजेते घोषित करण्यात येईल.

प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार तसेच ५ प्रोत्साहन पुरस्कार निकषांच्या व अंतिम निवडीच्या आधारावर घोषित करण्यात येतील.

## रोख पुरस्कार व इतर समर्थन

१. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना प्रत्येकी रुपये ५०००/-, ३०००/-, २०००/- तसेच प्रत्येकी रु १०००/- चे पाच पुरस्कार असे रोख पारितोषिक देण्यात येतील.

२. स्पर्धेत सहभागी उमेदवारांना सहभागाबद्दल पत्र देण्यात येईल.

३. विजेत्या संकल्पनांना पुढील वाटचाली करिता मार्गदर्शन व पाठबळ विद्यापीठाच्या ननवसा विभागाचे नवसंशोधन केंद्रअंतर्गत देण्यात येईल.

21-9-21

प्रा. मनिष द. उत्तरवार
संचालक, ननवसा
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

21/9/2021

डॉ. अनिल चिताडे
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली